नाशिक महानगरपालिका, नाशिक

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम – ९६ अन्वये,

मा. स्थायी समितीने संमत केलेले

अंदाजपत्रक

अ, क आणि प

सन २०२१–२०२२

(सन २०२०–२०२१ च्या सुधारित अंदाजपत्रकासह)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९६ अन्वये

मा.स्थायी समितीने संमत केलेले व मान्यता दिलेले

अंदाजपत्रक

'अ', 'क' आणि 'प'

सन २०२१-२०२२

(सन २०२०-२०२१ च्या सुधारित अंदाजपत्रकासह)

नाशिक महानगरपालिका, नाशिक

अनुक्रमणिका

अ.नं.	तपशील	पृष्ठ क्रमांक
1	मा. स्थायी समिती सभापतींचे निवेदन	44-45
2	मा. आयुक्तांचे निवेदन	46-68
3	जमा / खर्चाचे आलेख	69-77
4	महसुली व भांडवली जमा गोषवारा	78-79
5	महसुली व भांडवली खर्च गोषवारा	80-82
भाग- एक	**''अ'' अंदाजपत्रक**	**83-190**
6	"अ" महसुली जमा	83-105
7	"अ" महसुली जमा अनुदाने	95-97
8	"अ" भांडवली जमा	106
9	"अ" भांडवली जमा अनुदाने	106
10	"अ" महसुली खर्च	108-170
11	"अ" भांडवली खर्च	172-190
भाग- दोन	**"क" अंदाजपत्रक**	**191-210**
12	"क" महसुली जमा	191-192
13	"क" भांडवली जमा	193
14	"क" भांडवली जमा अनुदाने	193
15	"क" महसुली खर्च	194-205
16	"क" भांडवली खर्च	206-210
भाग- तीन	**"प" अंदाजपत्रक**	**211-223**
17	"प" महसुली जमा	211-213
18	"प" महसुली जमा अनुदाने	213
19	"प" भांडवली जमा	214
20	"प" भांडवली जमा अनुदाने	214
21	"प" महसुली खर्च	215-222
22	"प" भांडवली खर्च	223
भाग-चार	**राखीव निधी व जिल्हा/राज्य/केंद्र शासकीय योजना**	**224-269**
23	राखीव निधी	224-254
24	जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान	255-267
25	अमृत योजना	268-269
भाग-पाच	**भांडवली कामे**	**270 - 453**
26	भांडवली कामांचा गोषवारा	270-272
27	भांडवली कामांच्या याद्या (अ, ब, क, ड, इ)	273-453
28	मा. स्थायी समिती ठराव	454-478
29	वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रक ठराव	479-480

छत्रपती शिवाजी महाराज

राजर्षि छत्रपती शाहु महाराज

महात्मा ज्योतिबा फुले

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

कविवर्य वि.वा.(तात्यासाहेब) शिरवाडकर - कुसुमाग्रज

स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी

माजी पंतप्रधान

हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे



मा.श्री.रामनाथ कोविंद

राष्ट्रपती

मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी

पंतप्रधान

मा.श्री.जे.पी.नड्डा

राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी

मा.ना.श्री.अमित शहा

केंद्रीय गृह मंत्री

मा.ना.श्री.नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री (रस्ते, दळण-वळण, जहाज बांधणी)

मा.श्री.शरद पवार

माजी केंद्रीय कृषीमंत्री, भारत सरकार तथा
अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

मा.सोनीया गांधी

अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

मा.श्री.उध्दवजी ठाकरे

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

मा.श्री.अजित पवार

उपमुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन,
महाराष्ट्र राज्य

मा.आ.श्री.चंद्रकांतदादा पाटील

प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी

मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस

माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्ष नेते, विधानसभा महाराष्ट्र

मा.ना.श्री.छगन भुजबळ

मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, नाशिक

मा.श्री.एकनाथ शिंदे

नगरविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

मा.आ.श्री.गिरीष महाजन

माजी पालक मंत्री, नाशिक

मा.श्री.जयकुमार रावल

माजी पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य

उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भा.ज.पा. तथा प्रभारी नाशिक जिल्हा

मा.श्री.राजसाहेब ठाकरे

अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना

मा.श्री.रामदास आठवले

केंद्रीय मंत्री, सामाजिक न्याय एवं अधिकारीता मंत्रालय तथा
राष्ट्रीय अध्यक्ष, आर.पी.आय.(अे)

मा.श्री.नाना पटोले

प्रदेशाध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

मा.श्री.जयंत पाटील

जलसंपदा मंत्री तथा
प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

मा.श्री.हेमंत गोडसे
खासदार

मा.डॉ.सौ.भारतीताई पवार
खासदार
प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा

मा.प्रा.सौ.देवयानी फरांदे
आमदार
प्रदेश सरचिटणीस, भाजपा

मा.ॲड.श्री.राहुल ढिकले
आमदार

मा.डॉ.श्री.राहूल आहेर
आमदार

मा.सौ.सीमाताई हिरे
आमदार

मा.श्री.हेमंत टकले
आमदार

मा.श्रीम.सरोजताई आहिरे
आमदार

मा.श्री.किशोर दराडे
आमदार

मा.डॉ.श्री.सुधीर तांबे
आमदार

मा.श्री.नरेंद्र दराडे
आमदार

मा.श्री.गिरीष पालवे
शहराध्यक्ष, भाजपा, नाशिक

मा.श्री.लक्ष्मण सावजी
सदस्य, महा.प्रदेश, भाजपा

मा.श्री.विजय साने
जेष्ठ नेते, भाजपा

मा.श्री.सुहास फरांदे
जेष्ठ नेते, भाजपा

मा.श्री.सुधाकर बडगुजर
महानगर प्रमुख, शिवसेना

मा.श्री.अंकुश पवार
शहराध्यक्ष, मनसे

मा.श्री.रंजन ठाकरे
शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

मा.श्री.शरद आहेर
प्रदेश उपाध्यक्ष, काँग्रेस

मा.श्री.प्रकाश लोंढे
शहराध्यक्ष, आर.पी.आय.(ए)

स्वर्गीय शांतारामबापू वावरे

प्रथम महापौर

सन १९९२-९३, १९९३-९४

स्वर्गीय पंडीतराव खैरे

माजी महापौर

सन १९९४-९५

स्वर्गीय उत्तमरावजी ढिकले

माजी महापौर

सन १९९५-९६

सन्माननीय माजी महापौरांची कारकिर्द

मा.श्री.प्रकाश मते
सन १९९६-१९९७

मा.श्री.वसंतराव गिते
सन १९९७-१९९८

मा.श्री.अशोक दिवे
सन १९९८-१९९९

मा.डॉ.सौ.शोभाताई बच्छाव
सन १९९९-२००२

मा.श्री.दशरथ (अप्पा) पाटील
सन २००२-२००५

मा.श्री.बाळासाहेब सानप
सन २००५-२००७

मा.श्री.विनायक पांडे
सन २००७-२००९

मा.सौ.नयना घोलप
सन २००९-२०१२

मा. श्री.यतिन वाघ
सन २०१२-२०१४

मा.श्री.अशोक मुर्तडक
सन २०१४-२०१७

मा.सौ.रंजना भानसी
सन २०१७-२०१९

सन्माननीय माजी उपमहापौरांची कारकिर्द

मा.सौ.सुमनताई बागले
सन १९९२-१९९३

मा.सौ.शोभाताई छाजेड
सन १९९३-१९९४

मा.श्री.रामदास सदाफुले
सन १९९४-१९९५

मा.सौ.रंजनाताई बोराडे
सन १९९५-१९९६

मा.श्री.अशोक गोसावी
सन १९९६-१९९७

मा.श्री.मनिष बस्ते
सन १९९७-१९९८

मा.श्री.बाळासाहेब सानप
सन १९९८-१९९९

मा.श्री.गुलाम शेख
सन १९९९-२००२

मा.सौ.शोभना आहेर
सन २००२-२००५

मा.श्री.विनायक पांडे
सन २००५-२००७

मा.श्री.अजय बोरस्ते
सन २००७-२००९

मा.प्रा.सौ.देवयानी फरांदे
सन २००९-२०१२

मा.श्री.सतिश कुलकर्णी
सन २०१२-२०१४

मा.श्री.गुरुमित बग्गा
सन २०१४-२०१७

मा.श्री.प्रथमेश गिते
सन २०१७-२०१९

सन्माननीय माजी स्थायी समिती सभापती कारकिर्द

मा.श्री.उत्तमराव एलिया कांबळे
सन १९९२-९३, ९३-९४, २०००-०१

मा.श्री.निवृत्ती विठोबा आरिंगळे
सन १९९४-९५

मा.श्री.विजय बळवंत पाटील
सन १९९५-९६, ९६-९७

मा.श्री.बाळासाहेब सोनुजी आहेर
सन १९९७-९८

मा.श्री.शाहू सहदेवराव खैरे
सन १९९८-९९, २००३-०४

मा.श्री.अमोल रंगनाथ जाधव
सन १९९९-२०००

मा.श्री.नामदेव नभाजी महाले
सन २००१-२००२

मा.श्री.विजय राजाराम साने
सन २००२-२००३

मा.श्री.बळीराम रामभाऊ ठाकरे
सन २००४-२००५

स्व.अशोक सिताराम गवळी
सन २००५-२००६

मा.श्री.सुरेश अण्णाजी पाटील
सन २००६-२००७

मा.श्री.शरद किसनराव कोशिरे
सन २००७-२००८

मा.श्री.संजय उत्तमराव चव्हाण
सन २००८-२००९

मा.श्री.संजय किसनराव बागुल
सन २००९-२०१०

मा.श्री.संजय भरत साबळे
सन २०१०-२०११

मा.श्री.रणजित वसंतराव नगरकर
सन २०११-२०१२

मा.श्री.उध्दव बाबुराव निमसे
सन २०१२-२०१३

मा.श्री.रमेश शंकर धोंगडे
सन २०१३-२०१४

मा.ॲड.श्री.राहुल उत्तमराव ढिकले
सन २०१४-२०१५

मा.श्री.शिवाजी(आप्पा)चुंभळे
सन २०१५-२०१६

मा.श्री.सलिम इस्माईल शेख
सन २०१६-२०१७

मा.श्री.शिवाजी गांगुर्डे
सन २०१७-२०१८

मा.सौ.हिमगौरी आहेर
सन २०१८-२०१९

मा.श्री.उध्दव बाबुराव निमसे
२०१९-२०

सन्माननीय पदाधिकारी



मा.श्री.सतिष कुलकर्णी

महापौर, नाशिक

मा.श्रीम.भिकुताई बागुल

उपमहापौर, नाशिक

मा.श्री.गणेश गिते

सभापती, स्थायी समिती

मा.श्री.कैलास जाधव

आयुक्त, नाशिक

सन्माननीय पदाधिकारी

मा.श्री.सतिष सोनवणे
सभागृह नेता

मा.श्री.अजय बोरस्ते
विरोधी पक्ष नेता

मा.श्री.जगदीश पाटील
भाजपा गटनेता

मा.श्री.विलास शिंदे
शिवसेना गटनेता

मा.श्री.गजानन(नाना)शेलार
राष्ट्रवादी काँग्रेस गटनेता

मा.श्री.शाहु सहदेवराव खैरे
काँग्रेस गटनेता

मा.सौ.नंदिनी बोडके
मनसे गटनेता

मा.सौ.दिक्षाताई लोंढे
आर.पी.आय., गटनेता

विद्यमान स्थायी समिती

मा.श्री.गणेश बबन गिते
सभापती, स्थायी समिती

मा.श्री.अशोक देवराम मुर्तडक
सदस्य

मा.श्री.कमलेश मोहन बोडके
सदस्य

मा.श्री.सुधाकर भिका बडगुजर
सदस्य

मा.सौ.सत्यभामा लक्ष्मण गाडेकर
सदस्या

मा.सौ.कल्पना चंद्रकांत पांडे
सदस्या

मा.श्री.राहुल अशोक दिवे
सदस्य

मा.श्री.राकेश राजेंद्र दोंदे
सदस्य

मा.सौ.रुपाली यशवंत निकुळे
सदस्या

मा.सौ.स्वाती राजीव भामरे
सदस्या

मा.सौ.सुप्रिया सुनिल खोडे
सदस्या

मा.श्री.हेमंत दिनेश शेट्टी
सदस्य

मा.प्रा.श्री.शरद चिंतामण मोरे
सदस्य

मा.सौ.सुनिता उत्तम कोतुळे
सदस्या

मा.सौ.वर्षा अनिल भालेराव
सदस्या

मा.श्रीम.समिना शोएब मेमन
सदस्या

सन्माननीय नगरसेवक

मा.सौ.पुनम संजय धनगर
प्रभाग १ अ

मा.सौ.रंजना पोपट भानसी
प्रभाग १ ब

मा.श्री.गणेश बबन गिते
प्रभाग १ क

मा.श्री.अरुण बाबुराव पवार
प्रभाग १ ड

मा.सौ.पुनम भरत सोनवणे
प्रभाग २ अ

मा.श्री.सुरेश नारायण खेताडे
प्रभाग २ ब

मा.श्री.उध्दव बाबुराव निमसे
प्रभाग २ क

मा.सौ.शितल नितीन माळोदे
प्रभाग २ ड

मा.श्री.मच्छिंद्र बाळासाहेब सानप
प्रभाग ३ अ

मा.सौ.प्रियंका धनंजय माने
प्रभाग ३ ब

मा.सौ.पुनम दिगंबर मोगरे
प्रभाग ३ क

मा.श्री.रुचीकुमार मधुकरराव कुंभारकर
प्रभाग ३ ड

(रिक्त)
प्रभाग ४ अ

मा.सौ.सरिता रामराव सोनवणे
प्रभाग ४ ब

मा.श्री.जगदिश चिंतामण पाटील
प्रभाग ४ क

मा.श्री.हेमंत दिनेश शेट्टी
प्रभाग ४ ड

सन्माननीय नगरसेवक

मा.श्री.कमलेश मोहन बोडके
प्रभाग ५ अ

मा.सौ.नंदिनी खंडू बोडके
प्रभाग ५ ब

मा.सौ.विमल रमेश पाटील
प्रभाग ५ क

मा.श्री.गुरुमित अर्जुनसिंग बग्गा
प्रभाग ५ ड

मा.श्री.पुंडलिक पांडुरंग खोडे
प्रभाग ६ अ

मा.सौ.सुनिता ज्ञानेश्वर पिंगळे
प्रभाग ६ ब

मा.श्रीम.भिकुबाई किसन बागुल
प्रभाग ६ क

मा.श्री.अशोक देवराम मुर्तडक
प्रभाग ६ ड

मा.श्री.अजय भास्करराव बोरस्ते
प्रभाग ७ अ

मा.सौ.हिमगौरी बाळासाहेब आहेर
प्रभाग ७ ब

मा.सौ.स्वाती राजीव भामरे
प्रभाग ७ क

मा.श्री.योगेश रामराव हिरे
प्रभाग ७ ड

मा.श्रीम.नयना भरत गांगुर्डे
प्रभाग ८ अ

मा.सौ.राधा विष्णू बेंडकोळी
प्रभाग ८ ब

मा.श्री.संतोष धोंडिराम गायकवाड
प्रभाग ८ क

मा.श्री.विलास रामदास शिंदे
प्रभाग ८ ड

सन्माननीय नगरसेवक

मा.श्री.रविंद्र गोविंद धिवरे
प्रभाग ९ अ

मा.सौ.हेमलता दादा कांडेकर
प्रभाग ९ ब

मा.सौ.वर्षा अनिल भालेराव
प्रभाग ९ क

मा.श्री.दिनकर धर्मा पाटील
प्रभाग ९ ड

मा.सौ.माधुरी गणेश बोलकर
प्रभाग १० अ

मा.सौ.पल्लवी स्वप्नील पाटील
प्रभाग १० ब

मा.श्री.शशिकांत हरिभाऊ जाधव
प्रभाग १० क

मा.श्रीम.इंदुबाई सुदाम नागरे
प्रभाग १० ड

मा.सौ.दिक्षा दिपक लोंढे
प्रभाग ११ अ

मा.श्री.योगेश किरण शेवरे
प्रभाग ११ ब

मा.श्री.सलिम इस्माईल शेख
प्रभाग ११ क

मा.सौ.सिमा गोकुळ निगळ
प्रभाग ११ ड

मा.श्रीम.प्रियंका किशोर घाटे
प्रभाग १२ अ

मा.श्री.समीर उत्तमराव कांबळे
प्रभाग १२ ब

मा.डॉ.सौ.हेमलता निनाद पाटील
प्रभाग १२ क

मा.श्री.शिवाजी त्र्यंबक गांगुर्डे
प्रभाग १२ ड

सन्माननीय नगरसेवक

मा.श्रीम.वत्सला अर्जुन खैरे
प्रभाग १३ अ

मा.श्री.गजानन दामोदर शेलार
प्रभाग १३ ब

मा.ॲड.सौ.वैशाली भोसले
प्रभाग १३ क

मा.श्री.शाहु सहदेवराव खैरे
प्रभाग १३ ड

मा.सौ.शोभा संजय साबळे
प्रभाग १४ अ

मा.श्रीम.समिना शोएब मेमन
प्रभाग १४ ब

मा.श्री.मुशिर मुनिरोद्दीन सैय्यद
प्रभाग १४ क

मा.श्री.सुफियान इब्राहिम जीन
प्रभाग १४ ड

मा.सौ.अर्चना चंद्रकांत थोरात
प्रभाग १५ अ

मा.सौ.सुमन मधुकर भालेराव
प्रभाग १५ ब

मा.श्री.प्रथमेश वसंत गिते
प्रभाग १५ क

मा.सौ.सुषमा रवि पगारे
प्रभाग १६ अ

मा.सौ.आशा रफिक तडवी
प्रभाग १६ ब

मा.श्री.अनिल रामभाऊ ताजनपुरे
प्रभाग १६ क

मा.श्री.राहुल अशोक दिवे
प्रभाग १६ ड

मा.श्री.प्रशांत अशोक दिवे
प्रभाग १७ अ

सन्माननीय नगरसेवक

मा.सौ.मंगला प्रकाश आढाव
प्रभाग १७ ब

मा.सौ.सुमन ऊर्फ अनिता दत्तात्रय सातभाई
प्रभाग १७ क

मा.श्री.दिनकर गोटीराम आढाव
प्रभाग १७ ड

मा.प्रा.श्री.शरद चिंतामण मोरे
प्रभाग १८ अ

मा.श्रीम.रंजना प्रकाश बोराडे
प्रभाग १८ ब

मा.सौ.मिरा बबन हांडगे
प्रभाग १८ क

मा.श्री.विशाल उत्तम संगमनेरे
प्रभाग १८ ड

मा.श्री.संतोष शंकर साळवे
प्रभाग १९ अ

मा.सौ.जयश्री नितीन खर्जुल
प्रभाग १९ ब

मा.श्री.पंडीत दगु आवारे
प्रभाग १९ क

मा.श्री.अंबादास भास्कर पगारे
प्रभाग २० अ

मा.डॉ.सौ.सिमा राजेंद्र ताजणे
प्रभाग २० ब

मा.सौ.संगिता हेमंत गायकवाड
प्रभाग २० क

मा.श्री.संभाजी शामराव मोरुस्कर
प्रभाग २० ड

मा.ॲड.श्रीम.कोमल प्रताप मेहरोलिया
प्रभाग २१ अ

मा.श्री.रमेश शंकर धोंगडे
प्रभाग २१ ब

सन्माननीय नगरसेवक

मा.सौ.ज्योती शाम खोले
प्रभाग २१ क

मा.श्री.सूर्यकांत पांडूरंग लवटे
प्रभाग २१ ड

मा.श्री.जगदीश शंकर पवार
प्रभाग २२ अ

मा.सौ.सत्यभामा लक्ष्मण गाडेकर
प्रभाग २२ ब

मा.सौ.सुनिता उत्तम कोतुळे
प्रभाग २२ क

मा.श्री.केशव सिताराम पोरजे
प्रभाग २२ ड

मा.सौ.रुपाली यशवंत निकुळे
प्रभाग २३ अ

मा.श्रीम.शाहिन सलिमबेग मिर्झा
प्रभाग २३ ब

मा.श्री.सतीश लक्ष्मणराव कुलकर्णी
प्रभाग २३ क

मा.श्री.चंद्रकांत कारभारी खोडे
प्रभाग २३ ड

मा.सौ.कल्पना चंद्रकांत पांडे
प्रभाग २४ अ

मा.श्री.राजेंद्र उत्तमराव महाले
प्रभाग २४ ब

मा.सौ.कल्पना शिवाजी चुंभळे
प्रभाग २४ क

मा.श्री.प्रविण सावळीराम तिदमे
प्रभाग २४ ड

मा.श्री.सुधाकर भिका बडगुजर
प्रभाग २५ अ

मा.सौ.हर्षा सुधाकर बडगुजर
प्रभाग २५ ब

सन्माननीय नगरसेवक

मा.सौ.भाग्यश्री राकेश ढोमसे
प्रभाग २५ क

मा.श्री.शामकुमार दादाजी साबळे पाटील
प्रभाग २५ ड

मा.श्री.मधुकर भागीरथ जाधव
प्रभाग २६ अ

मा.सौ.हर्षदा समाधान गायकर
प्रभाग २६ ब

मा.सौ.अलका कैलास आहिरे
प्रभाग २६ क

मा.श्री.भागवत पाराजी आरोटे
प्रभाग २६ ड

मा.श्री.राकेश राजेंद्र दोंदे
प्रभाग २७ अ

मा.श्री.चंद्रकांत महादेव खाडे
प्रभाग २७ ब

मा.सौ.किरण पुंजाराम गामणे
प्रभाग २७ क

मा.सौ.कावेरी मारुती घुगे
प्रभाग २७ ड

मा.श्री.दत्तात्रय ग्यानदेव सुर्यवंशी
प्रभाग २८ अ

मा.सौ.प्रतिभा बाळासाहेब पवार
प्रभाग २८ ब

मा.सौ.सुवर्णा दिपक मटाले
प्रभाग २८ क

मा.श्री.दिपक निवृत्ती दातीर
प्रभाग २८ ड

मा.सौ.छाया दिलीप देवांग
प्रभाग २९ अ

मा.सौ.रत्नमाला सुरेश राणे
प्रभाग २९ ब

सन्माननीय नगरसेवक

मा.श्री.मुकेश दिलीप शहाणे
प्रभाग २९ क

मा.श्री.निलेश हंसराज ठाकरे
प्रभाग २९ ड

मा.श्री.श्याम धर्मराज बडोदे
प्रभाग ३० अ

मा.सौ.सुप्रिया सुनिल खोडे
प्रभाग ३० ब

मा.डॉ.सौ.दिपाली सचिन कुलकर्णी
प्रभाग ३० क

मा.श्री.सतिश यादवराव सोनवणे
प्रभाग ३० ड

मा.श्री.भगवान सुकदेव दोंदे
प्रभाग ३१ अ

मा.सौ.पुष्पा साहेबराव आव्हाड
प्रभाग ३१ ब

मा.सौ.संगिता अमोल जाधव
प्रभाग ३१ क

मा.श्री.सुदाम शंकर डेमसे
प्रभाग ३१ ड

सन्माननीय स्वीकृत नगरसेवक

मा.श्री.बाजीराव लहानु भागवत

मा.श्री.प्रशांत गोरख जाधव

मा.ॲड.श्री.अजिंक्य विजय साने

मा.ॲड.सौ.शामला हेमंत दिक्षीत

मा.श्री.सुनिल बाबुराव गोडसे

समाजलक्षी संघटना व बिगर सरकारी संघटनांचे प्रतिनिधी

मा.श्री.राजेश प्रभाकर गांगुर्डे
नाशिक पूर्व प्रभाग

मा.श्री.बापुराव दत्तात्रय कुलकर्णी
नाशिक पूर्व प्रभाग

मा.श्री.भुषण एकनाथ महाजन
नाशिक पूर्व प्रभाग

मा.श्री.किशन होलाराम अडवाणी
नाशिक पश्चिम प्रभाग

मा.श्री.पोपट वामन नागपुरे
नाशिक पश्चिम प्रभाग

मा.श्री.विवेक श्रीराम संत
नाशिक पश्चिम प्रभाग

मा.श्री.महेंद्र यशवंत आव्हाड
पंचवटी प्रभाग

मा.श्री.अनिल सुकदेव वाघ
पंचवटी प्रभाग

मा.श्री.सुधाकर गणेश माहुरकर
पंचवटी प्रभाग

मा.सौ.कांता सुरेश वराडे
नाशिक रोड प्रभाग

मा.श्री.अशोक तेजमल तापडीया
नाशिक रोड प्रभाग

मा.श्री.शंकर खंडू साडे
नाशिक रोड प्रभाग

मा.श्री.विजय नामदेव भंदुरे
सातपुर प्रभाग

मा.श्री.दशरथ लक्ष्मण लोखंडे
सातपुर प्रभाग

मा.सौ.पंकज मनोज संधान
नवीन नाशिक प्रभाग

मा.श्री.महारु(नानासाहेब)शंकर निकम
नवीन नाशिक प्रभाग

मा.श्री.धनाजी बहिरु लगड
नवीन नाशिक प्रभाग

सन २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक
'अ', 'क' आणि 'प' बाबत
मा.सभापती, स्थायी समिती यांचे निवेदन

सन्माननीय महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते, सर्व गटनेते, सर्व प्रभाग समिती सभापती, महिला व बालकल्याण समिती सभापती, सहकारी स्थायी समिती सदस्य आणि मान्यवर सहकारी नगरसेवक बंधु व भगिनींनो,

सन २०२०-२१ या वर्षात स्थायी समिती सभापती म्हणुन माझी निवड झाली त्यामुळे मला सन २०२१-२२ चे अंदापत्रक तयार करण्याची संधी मिळाली.

नाशिक महानगरपालिका लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सहाव्या कालखंडातील पांचव्या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्याची संधी देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नडडा, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.उध्दवजी ठाकरे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा.श्री.चंद्रकांत दादा पाटील, उपमुख्यमंत्री मा.श्री.अजितदादा पवार, म.न.से. अध्यक्ष मा.श्री.राजसाहेब ठाकरे, नाशिकचे पालकमंत्री मा.ना.श्री. छगनरावजी भुजबळ, मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब विरोधी पक्षनेता, मा.ना.श्री. दादा भुसे, कृषीमंत्री, माजी पालकमंत्री, मा.श्री.गिरीष महाजन, मा.खा.श्री.हेमंत (आप्पा) गोडसे, मा.खा. सौ.भारतीताई पवार, शहराध्यक्ष श्री.गिरीषजी पालवे, मा.आ.सौ.देवयानी फरांदे, मा.आ.सौ.सीमाताई हिरे, मा.ॲड.श्री.राहुल ढिकले, यांच्या सहकार्याने मला प्राप्त झाले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी सादर केलेल्या जमा खर्चाच्या आकडेवारीनुसार कलम ९६ अन्वये स्थायी समितीने अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार केले आहे.

मा.आयुक्त सो.यांनी सन २०२१-२२ आर्थिक अपेक्षित जमा रुपये २३६१.५३ कोटी धरुन त्यानुसार जमा व खर्चाची आकडेवारी विषद केली आहे.

मा.स्थायी समिती सभेमध्ये या विषयी चर्चा होऊन उत्पन्नामध्ये र.रु. ४०२.२५ कोटींची वाढ अपेक्षित धरली आहे. शहराच्या विकासाकरीता मुलभुत सुविधा उपलब्ध करण्याबरोबरच नागरीकांवर अतिरिक्त बोजा पडु नये याची काळजी अर्थसंकल्पात घेतली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सन २०२१-२२ या वर्षासाठी अपेक्षित जमा र.रु.२७६३.८१ कोटी व अपेक्षित खर्च र.रु.२७५९.९८. कोटी गृहीत धरुन र.रु.३.८३ कोटीचे शिल्लकी अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. नाशिक शहरातील नागरीकांवर घरपटटी, पाणी पटटीत कुठल्याही प्रकारची दरवाढ करण्यांत आलेली नाही.

अर्थसंकल्पात प्रामुख्याने त्या-त्या कामांसाठी आर्थिक तरतुद केल्या आहेत. विशेषत: त्यात खालील विकास कामांच्या बाबींसाठी आर्थिक तरतुद केली आहे. त्या बाबी खालीलप्रमाणे.

शहरातील वाढती रहदारी लक्षांत घेता नाशिक शहरातील विविध ठिकाणी असलेले मनपा भुखंड बी.ओ.टी.तत्वावर विकसित करणेसाठी देण्यांत येणार आहे त्यामुळे त्यापासुन मनपास आर्थिक उत्पन्नात वाढ होऊ शकते.

तसेच जाहिरातीलवरील कर व होर्डिंग परवाना फी, मनपा इमारत, गाळे, खुल्या जागा प्रिमियम मोबदला, हस्तांतरण फी पालिका बाजार ट्रक टर्मिनससह इ.पासुन मनपास वाढीव उत्पन्न मिळणेस मदत होणार आहे.

प्रभाग विकास कामे/खेडे विकास निधी :-

नाशिक शहरातील एकुण ३१ प्रभागामध्ये प्रत्येक नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील/वार्डातील विविध विकास कामे करणेसाठी प्रत्येकी र.रु.४० लक्ष वाढीव असे एकुण र.रु.८८.९० कोटी तरतुद करण्यांत आलेली आहे.

रस्ते बांधणे :-

नाशिक शहरातील पंचवटी विभागातील मखमलाबाद गांवाच्या स्मशानभुमीच्या दोन्ही बाजुने रस्ता खडीकरण करुन डांबरीकरण करणे तसेच राजमाता मंगल कार्यालय तलाठी कॉलनी येथुन वज्रेश्वरी येथे येणारा डी.पी.रस्ता विकसित करणे व गुंजाळनगर पुल ते नविन मार्केट यार्ड पर्यंत रिंगरोड विकसित करणे. तसेच मनपा हद्दीतील म्हसरुळ ते वरवंडी गांव रस्ता करणे, बोरगड परिसरातील रस्त्यांचे खडीकरण, डांबरीकरण करणे जुईनगर, ओमकारनगर व इतर परिसरातील रस्त्याचे खडीकरण/डांबरीकरण करणेसाठी सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात भरीव अशी तरतुद करण्यांत आलेली आहे.

पुल बांधणे :-

नाशिक मनपा पंचवटी विभागातील शरदचंद्र पवार मार्केट यार्ड समोरील पेठरोड येथे तसेच वज्रेश्वरी झोपडपटटी दिंडारी नाका येथे उड्डाण पुल बांधणेसाठी आर्थिक तरतुद करण्यांत आलेली आहे.

उद्यान विकास :-

पंचवटी विभागातील म्हसरुळ शिवारातील स.नं.१९७/१ ते १० + १९८ + १९९/१ + २०० + २०२१ मधील असलेल्या मनपाच्या ओपनस्पेस मध्ये अद्यावत असे उद्यान परिसरातील नागरीकांच्या मागणीनुसार विकसित करणार असुन त्यासाठी आर्थिक तरतुद करण्यांत आलेली आहे.

पंचवटी विभागातील किशोर सुर्यवंशी मार्गावर असलेल्या जिजामाता उद्यानाचे नुतनीकरण करणेसाठी सुध्दा तरतुद करण्यांत आलेली आहे. मनपा क्षेत्रात नविन वसाहतीमध्ये उद्यान विकसित करणेस तसेच सदर उद्यानात लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी व बेंचेस बसविणे, ग्रिन जीम साहित्यांची दुरुस्ती करणे, तसेच मनपा क्षेत्रातील उद्यानांची देखभाल करणेसाठी तरतुद करण्यांत आली आहे.

पथदिप विद्युतीकरण :-

नाशिक शहरातील वाढती लोकसंख्या लक्षांत घेता तसेच नव-नविन विकसित होणा-या वसाहतीमध्ये नाशिक पुर्व, नाशिक पश्चिम, पंचवटी, नाशिकरोड, सातपुर व नविन नाशिक येथे पथदिप विद्युतीकरण करणेसाठी र.रु.१७.३० कोटीची तरतुद करणेत आलेली आहे.

कोविड-१९ या संसर्गाच्या आजाराने बाधीत होणा-या रुग्णांसाठी नाशिक महानगरपालिकेने रुग्णालय व्यवस्थापन, नविन उपकरणे व साहित्य खरेदी करणे, मॉलिक्युलर डायग्नॉस्टीक रेफरेन्स लॅबोरेटरी सुरु करणेसाठी तसेच नाशिक मनपा हद्दीतील पंचवटी विभागात,सातपुर विभागात व नविन नाशिक विभागात १०० खाटांचे हॉस्पिटल/ऑक्सीजन प्लांट तसेच नाशिक मनपा हॉस्पिटल मध्ये आय.सी.यु/व्हेन्टीलेटर्सची सुविधा पुरविणे या कामी अंदाजपत्रकात र.रु.१२.०० कोटीची तरतुद करण्यांत आलेली आहे.

तसेच मा.सदस्यांनी त्यांनी त्यांच्या प्रभागातील विविध विकास कामे करणेसाठी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात भांडवली खर्चामध्ये तरतुद केलेली आहे.

राखीव बाबी :-

मागासवर्गीय वस्त्यां/प्रभागातील स्थापत्य व्यवस्थापन विषयक विकास कामे तसेच पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे, मलनिस्सारण विषयक कामे करणे, विद्युत विषयक कामे, उद्यान विषयक कामे, महिलां व बालकांसाठी स्थापत्य व्यवस्थापन विषयक विकास कामे करणे तसेच नविन क्रिडांगणे/विविध खेळांचे इनडोअर व आऊटडोअर स्टेडियम्स/व्यायामशाळा/जॉगींग ट्रॅक इ.विकसित करणेसाठी सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पामध्ये भरीव अशी तरतुद करण्यांत आलेली आहे. उपरोक्त बाबींबरोबर सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनांचा अंतर्भाव होणे अपेक्षित आहे.

अर्थसंकल्प तयार करतांना मा.महापौर सतिश (नाना) कुलकर्णी, उपमहापौर मा.भिकुबाई बागुल, सभागृहनेता मा.सतिश सोनवणे, विरोधी पक्ष नेता मा.अजय बोरस्ते, भाजपा गटनेते मा.जगदीश पाटील, शिवसेना गटनेते मा.विलास शिंदे, काँग्रेस गटनेते मा.शाहु खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते मा.गजानन शेलार, महाराष्ट्र नवनिर्माण सेना गटनेत्या मा.नंदिनी बोडके, आर.पी.आय.(अे) गटनेते मा.दिक्षाताई लोंढे, महिला बाल कल्याण समिती सभापती मा.स्वाती भामरे, महापालिका आयुक्त मा.कैलास जाधव तसेच सर्व स्थायी समिती सदस्य, नगरसेवक, अधिकारी व वृत्तवाहिनी प्रतिनिधी आणि पत्रकार तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबददल आभार मानून तसेच उपरोक्त बाबींबरोबर सभागृहातील सन्मानीय सदस्यांनी केलेल्या सुचनांचा अंतर्भाव तसेच भुसंपादनासाठी तरतुद करणेत येऊन सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास दुरुस्तीसह अंतिम मान्यता द्यावी अशी मी सन्माननीय सभागृहास विनंती करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

(गणेश बबनराव गिते)
सभापती,
स्थायी समिती
नाशिक महानगरपालिका,नाशिक

नाशिक महानगरपालिका, नाशिक

सन २०२०-२१ चे सुधारीत व सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक

महापालिका आयुक्तांचे निवेदन

सन्माननीय सभापती, स्थायी समितीचे सर्व सन्माननीय सदस्य व पत्रकार बंधू भगिनींनो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-९५ अन्वये,नाशिक महापालिकेच्या जमा - खर्चाचे सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ चे मूळ अंदाज मा. स्थायी समितीस सादर करीत आहे. सदर अंदाज तयार करत असतांना, महापालिकेस प्राप्त होणारे विविध कर, शुल्क, फी, अनुदाने व अन्य जमा लक्षात घेऊन, मनपा कार्यक्षेत्रात करावयाची विकास कामे व पुरवावयाच्या सेवांसाठी होणाऱ्या खर्चाचा प्राधान्यक्रम ठरवून योग्य ताळमेळ घालणेचा प्रयत्न केलेला आहे.

शहरातील रस्ते, पदपथ, उड्डाणपूल, जलवाहिन्या, मलनि:स्सारण वाहिन्या, विद्युतीकरण, परिवहन, उद्यान विकास, शिक्षण, वैद्यकिय सेवा, घनकचरा व्यवस्थापन, इ. नागरी सुविधांची पूर्तता करतांना समतोल विकासाचा विचार करण्यात आला आहे. रहिवासी तरुण, प्रौढ, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, मागासवर्गीय, उद्योजक, नोकरदार अशा सर्वच घटकांना अपेक्षित सेवा-सुविधांची दर्जात्मक पूर्तता करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. तसेच ई-गव्हर्नन्सचा प्रभावी वापर करुन, सुलभ, पारदर्शक व गतिमान प्रशासकीय कामकाज करण्यावर भर देण्यात येत आहे.

सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रक

सन २०२०-२१ च्या मंजूर अर्थसंकल्पानुसार नोव्हेंबर २०२० पर्यंतच्या आठमाही कालावधीत प्रत्यक्ष जमा झालेला महसूल व करण्यात आलेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच उर्वरित चार महिन्यांच्या कालावधीत प्राप्त होणारी जमा आणि विकास कामावरील खर्च गृहित धरुन, सन २०२०-२१ चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार रु.७३९.८७ कोटी आरंभीच्या शिल्लकेसह,रु. २२३९.३७ कोटी जमा व रु. १९८५.५१ कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. तसेच सन २०२०-२१ च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार अखेरची शिल्लक रु. २५३.८६ कोटी दर्शविण्यात आलेली आहे.

सन २०२१-२२ चे मूळ अंदाजपत्रक

सन २०२१-२२ ह्या वर्षांचे अंदाज तयार करतांना यापुर्वी हाती घेतलेल्या कामांचे दायित्व व जमा होणारा महसुल याचा वास्तववादी विचार करून, जमा खर्चाचे अंदाज तयार करण्यात आले आहेत.

- उत्पन्नाच्या बाबी -

महापालिकेच्या महसुलामध्ये प्रामुख्याने जीएसटी अनुदान, मालमत्ता कर, नगररचना शुल्क व पाणीपट्टी यांचा समावेश आहे. तसेच मालमत्ता उपयोगिता, विविध सेवा व अन्य साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा समावेश आहे.

स्थानिक संस्था कर/ जीएसटी :

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार असाधारण क्रमांक ५५ अन्वये वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणी मुळे जकात व स्थनिक संस्था कर रद्द केल्याने स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्यासाठी अनुदान देण्याचे धोरण निश्चित केले आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत दरमहा रू. ८४.९५ कोटी अनुदान (वार्षिक रू. १०९०.४० कोटी) प्राप्त होत आहे. सन २०२१-२२ करीता त्यामध्ये ८% वाढ गृहित धरून रू. ११००.९५ कोटी अनुदान प्राप्त होऊ शकेल. तसेच पुढील वर्षी शासनाकडून १ % मुद्रांक शुल्क अनुदाना पोटी र.रू. ४५.०० कोटी प्राप्त होऊ शकतील.

उपरोक्त प्रमाणे सन २०२१-२२ मध्ये महानगरपालिकेस अंदाजे रु. ११४७.०८ कोटी इतके उत्पन्न प्राप्त होईल.

सन १९-२० प्रत्यक्ष	१००२.०१
सन २०-२१ सूधारीत	१०३८.८२
सन २१-२२ प्रस्तावित	११४७.०८

मालमत्ता कर :

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे अचूक व पूर्ण करनिर्धारण करणे आवश्यक आहे. शहरातील कोणतीही मालमत्ता कर आकारणीविना राहू नये, यादृष्टीने मालमत्ता सर्वेक्षणाचे काम हाती घेतले असून,सर्व मिळकतींचे जी.आय.एस. मॅपिंग करण्यात येत आहे. मिळकत सर्व्हेक्षणाचे काम अंतीम टप्प्यात आहे.तसेच जुन्या व नव्याने कर लागू होणाऱ्या मिळकतींमधील वापर बदल, वाढीव बांधकामे,भाडेपट्टा इ.साठी वाढीव मालमत्ता कर लागू करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सर्वेक्षणातील नवीन मिळकतींच्या भोगवटादारांना विशेष नोटीसा देण्यात येत आहेत. तसेच प्राप्त होणाऱ्या हरकतींवर निर्णय घेण्यात येत आहे.

कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भावामुळे संपुर्ण देशामध्ये जमावबंदीचे (लॉकडाऊन) आदेश निर्गमित केल्याने, जगातील संपूर्ण आर्थिक व्यवस्था ठप्प झाली असुन, त्याचा परिणाम भारताच्या आर्थिक व्यवस्थेवर देखील झालेला आहे. त्यामुळे नाशिक शहरातील संपुर्ण औद्योगिक क्षेत्र, बांधकाम व्यवसाय, शेती व्यवसाय व व्यापारी बाजारपेठ पुर्णत: बंद असल्या कारणास्तव त्याचा परिणाम मालमत्ता कर वसुलीवर दिसुन आलेला आहे. सन २०२०-२१ चे वसुली इष्टांक पुर्ण करणे क्रमप्राप्त असल्याने, नाशिक महानगरपालिकेने मा. महासभेच्या मान्यतेने नियम ४१ अन्वये लागु असलेली शास्ती व इतर फी वर सवलत देणे व इतर सवलतीची योजना राबविण्यात आली.

मालमत्ता कराच्या सुलभ भरण्यासाठी महापालिकेच्या २२ नागरी सुविधा केंद्रांमध्ये रोख, धनादेश, क्रेडिटकार्ड, डेबिटकार्ड यांद्वारे कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. www.nmctax.in या संकेतस्थळावर तसेच NMC e-Connect मोबाईल ॲपवर नेटबँकिंगद्वारे ऑनलाईन कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच थकबाकीदार मिळकतधारक यांना मालमत्ता कर भरणेबाबत SMS द्वारे प्रतिमहा सुचित करणेत येत आहे. मालमत्ता कराचा भरणा मालमत्ताकर थकबाकी ना-हरकत दाखला, मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र, वारसा हक्क मालमत्ता हस्तांतरण प्रमाणपत्र, डिमांड उतारा, रिव्हीजन उतारा या ई-सेवा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

सन १९-२० प्रत्यक्ष	१३५.६०
सन २०-२१ सूधारीत	११०.४७
सन २१-२२ प्रस्तावित	१७०.७३
• मनपा स्व:उत्पन्न व • मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बाबींसहीत एकुण उत्पन्न	

नगररचना शुल्क :

नगर नियोजन विभागामार्फत प्रामुख्याने बांधकाम परवानगी, भोगवटा दाखला, तात्पुरता व अंतिम अभिन्यास व झोनिंग दाखला इ. प्रकारच्या सेवांकरिता शुल्क आकारण्यात येतात. नाशिक शहराच्या विकास योजना आराखडयास मा. शासन अधिसुचना क्रमांक टिपीएस-१११६/सीआर.१४० (अ)/२०१६/नवि-९, दिनांक ९ जानेवारी २०१७, एम-७८ अन्वये

सन १९-२० प्रत्यक्ष	२९९.६८
सन २०-२१ सूधारीत	१३७.३२
सन २१-२२ प्रस्तावित	४५३.०८
• मनपा स्व:उत्पन्न व • मा.शासनाकडे जमा करण्यात येणाऱ्या बांधकाम खर्चावर आधारीत उपकर सहित एकुण उत्पन्न	

मंजुरी मिळालेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनामार्फत दि. ०३/१२/२०२० रोजी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०२० देखील मंजूर करण्यात आलेली आहे.

एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०२० नुसार अनुज्ञेय एकूण चटई क्षेत्र निर्देशांक यात वाढ करण्यात आलेली आहे. तसेच अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासह रहिवासी क्षेत्राकरिता ६०% व व्यवसायीक बांधकाम क्षेत्राकरिता ८०% सहायक अतिरिक्त (Ancillary Premium) क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात आला आहे. यामुळे बांधकाम प्रकल्प मंजूर करतेवेळी विकास शुल्काद्वारे उत्पन्न वाढीस मोठया प्रमाणावर मदत होणार आहे.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील अनेक प्रकल्पांची मंजूरी विकसन धारकांनी शासनाकडून मंजूर होऊन येणाऱ्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० च्या अनुषंगाने थांबविलेली होती. सदर प्रकल्पे आता मंजूरीस येणार आहे. तसेच सद्यस्थितीत प्रगतीत असलेले अनेक बांधकाम प्रकल्प एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०२० मधील अनुज्ञेय एकूण चटई क्षेत्र निर्देशांक, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक आणि सहायक अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अशा वाढीव बांधकाम क्षेत्राकरिता पुनश्च: सुधारित मंजूरीस येणार आहे. त्यामूळे देखील मोठया प्रमाणावरील विकास शुल्क वसूल होऊन नाशिक महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे.

वरील बाबींचा विचार करता सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये नगर रचना विभागाकरिता ठरवुन देण्यात आलेले उद्दिष्ट प्राप्ती करणे शक्य होईल.

<u>पाणीपट्टी :</u>

सन १९-२० प्रत्यक्ष	५२.२३
सन २०-२१ सूधारीत	४०.००
सन २१-२२ प्रस्तावित	७५.००

नाशिक महानगरपालिकेच्या अनेक कर्तव्यांपैकी नागरिकांना पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे ही अत्यंत महत्वाची मूलभूत सेवा आहे. त्यामुळे याकडे प्राधान्याने लक्ष देणेत येत आहे. यामध्ये महानगरपालिकेस गंगापूर धरण, मुकणे धरण व दारणा नदीवरील चेहेडी येथील बंधा-यावरुन पाणी पुरवठा होतो.

नाशिक महानगरपालिकेने सल्लागार नेमून पाणी लेखापरीक्षण (Water Audit) करण्यात आलेले असून प्राप्त अहवालानुसार हिशोबबाहय पाणी (NRW) ४४ टक्के आहे असे निदर्शनास आले आहे. सदर अहवालानुसार सदर NRW हा मुख्यत: सद्य:स्थितीतील नळ जोडणीला असलेली मेकॅनिकल टाईप जलमापके नादुरुस्त असणे, प्रत्यक्ष वापरापेक्षा कमी रिडींग दाखवणारे जलमापके किंवा नळ जोडण्यांची असलेली संख्या व देयके ग्राहकांपर्यंत पोहचविणे वेळेत पूर्ण न होणे इत्यादी कारणांमुळे सरासरी प्रमाणे किंवा चुकीच्या पध्दतीने व कमी आकारणी करुन बिले देणे यामुळे अप्रत्यक्ष तूट दिसून येते. तसेच जलशुध्दीकरण केंद्र,वितरण व्यवस्थेतील पाणी गळती व अनाधिकृत नळ जोडणी, पाणी चोरी इत्यादी मुळे प्रत्यक्ष झालेली तूट इत्यादी मिळून ४४ टक्के पर्यंत NRW वाढलेला दिसतआहे.

हिशोबबाहय पाणी कमी करण्यासाठी स्मार्ट सिटी अंतर्गत स्मार्ट मिटर बसविणे व SCADA कार्यप्रणाली लावणे इत्यादी प्रस्ताव घेण्यात आलेला आहे तसेच अनधिकृत नळ जोडण्या खंडीत करावयाची व दंडात्मक कारवाई करून नियमीत करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे

सद्य:स्थितीत दरवर्षी पाणी पुरवठा करण्यासाठी दुरुस्ती व देखभाल खर्च पाणीपट्टी वसुलीपेक्षा जास्त असल्यामुळे जमा व खर्चात तफावत आहे. हे सर्व करत असतांना मा.महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील दिनांक ०२/०८/२०१० रोजीच्या निर्गमित शासन निर्णयान्वये पाणी पुरवठा यंत्रणा ना नफा ना तोटा तत्वावर चालविणे आवश्यक आहे.

त्यामुळे पाणी पुरवठा योजना चालविणेसाठी येणारा खर्च म्हणजे पाणी उत्पादन खर्च भरुन काढणे इतपत उपभोक्ता आकार (पाणीदर) लावणेबाबत सुचना केली आहे. या शासन निर्णयामध्ये विहित मार्गदर्शक तत्वानुसार पाणीपट्टीचे दर व्हॅल्युमेट्रीक (volumetric) पध्दतीने आकारणे यावे असे नमूद केले आहे. देखभाल दुरुस्ती कार्यक्षम करणेचे दृष्टीने तसेच कमी पाणी वापर करणाऱ्या नागरिकांना त्यांच्या वापराएवढेच दर लावून जनतेवर जास्त कराचा बोजा न लावता जो जास्त पाणी वापरेल त्यालाच पाणी वापरानुसार जास्त दर हे टेलिस्कोपिक (Telescopic) रेटचे व इक्विटेबल ॲक्सेसचे न्यायतत्व व वापरानुसार दर (User Charges) हे तत्व वापरुन नवीन कररचना करणे आवश्यक आहे. नाशिक मनपाने सन २००९-१० पासून पाणीपट्टी दरामध्ये वाढ केलेली नाही. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या दरानुसार सन २०२१-२२ चे उद्दीष्ट जलगळती थांबविणे NRW कमी करणे, अनधिकृत नळ जोडणीवर कारवाई करणे व थकबाकी वसुल करणे इ.माध्यमातून साध्य करण्यात येईल.

<u>जाहिरात व परवाने विभाग :</u>

सन १९-२० प्रत्यक्ष	१.७१
सन २०-२१ सूधारीत	०.४३
सन २१-२२ प्रस्तावित	६.५०

चालु आर्थिक वर्षामध्ये कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामूळे देशभर झालेल्या लॉकडाऊनचा परिणाम मनपाच्या वसूलीवर देखील झालेला आहे. मनपा मालकीचे एकूण ६१ शॉपिंग सेंटर असून त्यामध्ये २०७४ गाळे व ८५१ ओटे आहेत.

तसेच, सदर गाळयांची मागणी, वसूली व थकबाकीची अद्यावत माहिती उपलब्ध होणेकामी व गाळेधारकांना विनाविलंब बिले पोहोच करणेकामी संगणकीकरण आज्ञावली कार्यान्वित करणेत आलेली असून, संगणकीय मागणी बिले पोहोच करुन, त्याव्दारे वसूलीचे प्रमाण वाढविण्याचा मानस आहे. सदर शॉपिंग सेंटरमधील गाळेधारकांना आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा पुरविणेत येणार असून, सदरचे गाळे बाजारभावाप्रमाणे ई-लिलावाव्दारे देणेत येणार आहे. जेणेकरुन उत्पन्नात वाढ होईल. तसेच नैसर्गिक न्याय व समानतेच्या तत्वाचे देखील पालन होईल.

व्यवसाय परवान्यांप्रमाणेच शहर सौंदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातुन विविध जाहिरात माध्यमे (Hoarding) उभारणेबाबत तसेच विदयुत खांबांवर जाहिरात करणेबाबतची निविदा प्रक्रिया राबवून महानगरपालिकेस भरीव उत्पन्न प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच मनपाचे मालकीचे अधिकृत जाहिरात होर्डींग करीता नव्याने जागा शोधुन त्याव्दारे मनपाचे उत्पन्न वाढविणेचे प्रयत्न केले जाणार असुन नव्या जागा शोधतांना शहर विद्रुपीकरण होणार नाही याची देखील काळजी घेतली जाणार आहे. तसेच अनधिकृत जाहिरात होर्डींग शोधुन त्यांच्यावर दंडात्मक स्वरुपाची तसेच ते अतिक्रमण विभागाच्या मदतीने हटविणे बाबतची कारवाई प्रस्तावित असुन शहरातील अनधिकृत होर्डीगमुळे होणारे विद्रुपीकरण थांबविले जाणार आहे. जाहिरात होर्डीगच्या परवानाकरीता ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या नागरिकांनी आवश्यक त्या परवानग्या घेणे बंधनकारक आहे. तथापि, आतापर्यंत अशा परवाना शुल्काची आकारणी करणेत आलेली नाही. तथापि, या वर्षांत परवाना शुल्काचे वसुलीची अंमलबजावणी करणेत येणार असुन त्याव्दारे महानगरपालिकेस उत्पन्न प्राप्त होणार आहे. व्यवसाय परवाना देण्याची प्रक्रिया पारदर्शी व सुलभ करण्यासाठी परवाना देण्याची, नुतनीकरणाची सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन

देण्यात येणार आहे. तसेच याकरीता आवश्यक कागदपत्रांची संख्या मोजकीच ठेवण्यात आलेली आहे.

खर्चाच्या बाबी

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून खर्चाच्या बाबींची प्राथमिकता ठरवितांना आधुनिक सोयी सुविधांयुक्त रस्ते, पाणी पुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, वैदयकीय रुग्णालये, सार्वजनिक स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन,नदी स्वच्छता,परिवहन सेवा, उद्याने, क्रिडांगणे, महिलांसाठी सुविधा, पर्यावरण व गोदावरी संवर्धन इ. बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम :

मुख्य रस्ते/अंतर्गत रस्ते विकसित करणे :

सन १९-२० प्रत्यक्ष	१३९.८०
सन २०-२१ सूधारीत	१०८.५०
सन २१-२२ प्रस्तावित	२१०.००
*भांडवली खर्च	

शहरातील विविध ठिकाणी भागात रहिवाशांसाठी वाहतुक सुलभ होणेच्या दृष्टीने रस्त्यांचे अस्तरीकरण करणे, खडीच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे व नव्याने विकसित झालेल्या वसाहतींमध्ये खडीचे रस्ते तयार करण्याचे कामाचे नियोजन करणेत आले असून विविध विभागातील खडीकरण, डांबरीकरण, काँक्रीटीकरण करणेची कामे हाती घेणेत आलेली आहेत सदर कामे कार्यारंभ स्तरावर असून मुदतीत कामे पुर्ण करणेचा मानस आहे. तसेच सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतींमधील रस्त्यांची सुरु असलेली कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

रस्त्यांची कामे करतांना विकास आराखडयानुसार रुंदी व मंजूर ले-आऊट मधील रत्यांची रुंदीचा (Right of Way) विचार करणे गरजेचे आहे. तसेच आवश्यक गाडीमार्गाची रुंदी (Carriage Way), पाणी निचरा जलनि:स्सारण व्यवस्था, युटीलिटी डक्टस्, फुटपाथ इ. सुविधांचा अंतर्भाव करुन, शहर व आजूबाजूच्या खेडयातील नागरिकांना सुव्यवस्थित सुविधा देण्याचा मानस आहे. त्याचप्रमाणे प्राधान्याने जोडरस्ते (Missing Link) विकास करणेचे नियोजन करणेत आलेले आहे.

इमारत बांधणे :

सन १९-२० प्रत्यक्ष	८.८५
सन २०-२१ सूधारीत	१२.००
सन २१-२२ प्रस्तावित	१५.००
*भांडवली खर्च	

नाशिक पुर्व विभागातील स. नं. २४२ नाशिक पुर्व विभागीय कार्यालयासाठी प्रशासकीय इमारत बांधणेचे तसेच गंगापुर रोड येथील स. नं. ४५० येथे नाटयगृह बांधणेचे प्रस्तावित आहे.

पुल व सांडवे बांधणे :

सन १९-२० प्रत्यक्ष	४.४९
सन २०-२१ सूधारीत	६.००
सन २१-२२ प्रस्तावित	१८.००
*भांडवली खर्च	

नाशिक शहरातील वाहतुकीच्या कोंडीच्या दृष्टीने वर्दळीच्या ठिकाणी पुल व सांडवे बांधणे अंतर्गत नवीन नाशिक विभागात उड्डाणपुल त्रिमुर्ती चौक सिटी सेंटर मॉल येथे उड्डाणपुल, नाशिक पश्चिम विभागात मायको सर्कल येथे उड्डाणपुल बांधणेचे काम प्रस्तावित करणेत आलेले आहे. या आर्थिक वर्षात मनपा हद्दीतील विविध खेडयांमधील नाले, कॅनालच्या जागा यावरुन दळणवळण सुलभतेकरिता विविध ठिकाणी पुल व सांडवे बांधणे, गँबीयन वॉल बाधणे, सी.डी.वर्क बांधणेची कामे प्रस्तावित आहे.

स्मशानभूमींची सुधारणा/नुतनीकरण :

सन १९-२० प्रत्यक्ष	३.२२
सन २०-२१ सूधारीत	३.७५
सन २१-२२ प्रस्तावित	८.००
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

सद्यास्थितीत करोना संसर्गं व इतर संसर्गं आजारामुळे मृत्युचे प्रमाणे वाढल्याने तसेच पर्यावरणाचे प्रदुषण टाळणेकामी पंचवटी, नवीन नाशिक आणि नाशिकरोड विभागात विद्युत शवदाहिनीचे काम हाती घेणेत येणार आहे. तसेच अल्पसंख्यांक समाजाच्या स्मशानभुमींची /दफनभुमींची सुधारणा व नुतनीकरण करणेत येत आहे. याव्यतिरिक्त स्मशानभुमी परिसरातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नातेवाईक/नागरिकांसाठी बैठक व्यवस्था इ. सुविधा पुरविणेबाबत विशेष दक्षता घेणेत येत आहे.

व्यावसायिक मार्केट उभारणी :

सातपूर गावठाणातील छत्रपती शिवाजी मंडई मध्ये फळभाजी व्यवसायिकांसाठी नवीन ओटे बांधणे, तसेच विविध ठिकाणी वाढीव मार्केट उभारणेचे नियोजन करणेत आलेले आहे. सन २०२०-२१ च्या सुधारित अंदाजपत्रकात रक्कम रू. २.२६ कोटी व सन २०२१-२२ करीता रक्कम रू. ०५.०० कोटी तरतुद धरण्यात आली आहे.

महिलांसाठी जलतरण तलाव बांधणे :

नवीन नाशिक मधील सर्व्हे नं. २१९ मध्ये महिलांसाठी स्वतंत्र जलतरण तलाव प्रस्तावित असून त्यासाठी र.रू. १ कोटी ४५ लक्षची तरतुद धरण्यात आली आहे.

पाणी पुरवठा व्यवस्थापन व यांत्रीकी :

सन १९-२० प्रत्यक्ष	६७.७८
सन २०-२१ सूधारीत	१००.३०
सन २१-२२ प्रस्तावित	१२७.१७
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

नाशिक शहराच्या गरजेपैकी ७०% पाणी गंगापूर धरणातुन व २०% पाणी मुकणे धरणातुन तर १०% पाणी दारणा नदीवरील चेहडी बंधाऱ्यातुन उचलण्यात येते. शहरातील सात जलशुध्दीकरण केंद्रात त्यावर प्रक्रीया करून सम्प पंप/एमबीआर मार्फत पाणी ईएसआर मध्ये घेतले जाते. ईएसआर मधून जलवितरण वाहिन्याद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत ७ जलशुध्दीकरण केंद्र, ७ व ११० एमबीआर/ ईएसआर/जीएसआर द्वारे सुमारे २२२९ कि.मी.जलवितरण वाहिन्यातुन पाणी वितरण करण्यात येत आहे.साधारणत: शहरात सुमारे ५०० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा करण्यात येतो.

सद्यस्थितीत ग्राहक पाणी मीटर मॅकेनिकल बी-टाईपचे असून ते लवकर नादुरूस्त होतात. तसेच पाणी वापर देयकांत नागरीकांना सरासरी बिल आकारणी होते. पाणी वापरानुसारच देयक आकारणी होण्याच्या दृष्टीने स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरातील सर्व नळ जोडण्यांना AMR सुविधेसह जलमापके बसविण्यात येणार आहेत. SCADA (Supervisiory control & Data Acquisition) व AMR (Automated Meter Reading) जलमापकांसाठी स्मार्ट सिटी प्रकल्पात तरतुद करण्यात आली आहे. तसेच गावठाण भागातील जुन्या जलवाहिन्या पाणी गळती, असमान पाणी पुरवठा व दुषीत पाणी समस्येच्या परिमार्जनसाठी स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत ग्राहकांना २४ x ७ पाणी पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येत आहे. जुन्या व खराब झालेल्या जलवाहिन्या काढून नविन जलवाहिन्या टाकण्यात येणार आहेत. तसेच एकूण १७ नविन जलकुंभ बांधून त्याद्वारे २४ x ७ पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.

तसेच जलशुध्दीकरण केंद्र दुरूस्ती, नविन वितरीका व जलकुंभासह पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेतील सुधारणेसाठी र.रू. २२६ कोटी खर्चाचा प्रकल्प अहवाल (DPR) अमृत योजनेअंतर्गत निधी मिळणेसाठी शासनास सादर करण्यात आला आहे.

पाणी पुरवठा वितरण व्यवस्था Distribution System) सुधारणेच्या दृष्टीने मनपानिधीतुन विकसीत होणाऱ्या भागातील जलकुंभ व वितरण वाहिन्यांची कामे पूर्ण करणे, वितरण वाहिन्या नसलेल्या भागात जलवाहिन्या टाकणे तसेच जुन्या वितरीका बदलणे. तसेच नाशिक रोड विभागासाठी गंगापूर धरणातुन रॉ वॉटर घेणेसाठी गांधीनगर जलशुध्दीकरण ते नाशिक रोड जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत नविन डी. आय. पाईप लाईन टाकणे. तसेच नाशिकरोड येथील २३ एम एल डी क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राची दुरूस्ती व नुतनीकरण करणे, त्याचप्रमाणे पंचवटी विभागातील जुन्या जलशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण करणे या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे.

मलनि:स्सारण व्यवस्थापन व यांत्रीकी :

सन १९-२० प्रत्यक्ष	६५.४०
सन २०-२१ सूधारीत	८८.४६
सन २१-२२ प्रस्तावित	११८.४८
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

मलवाहिका टाकणे – नाशिक मनपा क्षेत्रात ६ विभागाच्या एकुण २१० कि.मी. लांबीच्या मलवाहिका टाकणेची कामे पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. आजमितीस नाशिक महापालिका क्षेत्रात एकुण १७९८ कि.मी. लांबीच्या मलवाहिकांचे जाळे निर्माण करणेत आलेले आहे.

अस्तित्वातील तपोवन व आगरटाकळी तसेच चेहेडी व पंचक येथील मलनि:स्सारण केंद्राचे नविन मानांकाप्रमाणे सुधारणा करणे या कामांचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरी करीता शासनाच्या पर्यावरण विभागाकडे सादर करणेत आला असुन राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाकडे मंजुरीसाठी पाठपुरावा करणेत येत आहे. तसेच नविन विकसीत भागात मलवाहिका टाकणे व अस्तित्वातील जुन्या मलवाहिकांची सुधारणा करणे प्रस्तावित आहे.

अमृत योजना:– केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाअंतर्गत गंगापुर गांव येथे १८ द.ल.लि. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र, ४.५० द.ल.लि. क्षमतेचे मलजल उपसा केंद्र बांधणे, चिखली नाला येथे २५ द.ल.लि. क्षमतेचे मलजल उपसा केंद्र बांधणे व पिंपळगांव खांब ३२द.ल.लि. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र बांधणे व ५५ द.ल.लि. क्षमतेचे मलजल उपसा केंद्र बांधणे या कामांना अनुक्रमे २८७९.१९ व ५३४६ लक्ष यास केंद्र शासनाची मंजुरी मिळाली आहे. सदर कामापैकी गंगापुर गांव येथील मलनि:स्सारण केंद्राचे काम पुर्ण झाले असुन माहे आक्टोबर २०२० पासुन पुर्ण क्षमतेने सदर प्रकल्प कार्यान्वित करणेत आलेला आहे. तसेच पिंपळगांव खांब येथील ३२ द.ल.लि. क्षमतेचे मलजल प्रक्रिया केंद्र बांधणेचे काम प्रगतीपथावर असुन ५५ द.ल.लि. क्षमतेचे मलजल उपसाकेंद्र बांधणेचे काम पुर्ण झाले असुन सदरचा प्रकल्प माहे मार्च २०२१ पावेतो पुर्ण करणेचे उद्दिष्ट आहे.

केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम (JNNURM) प्रकल्पांतर्गत तपोवन मलनि:सारण केंद्रामध्ये बायोगॅस इंजिन बसविण्यात आले आहे. त्यातून तयार होणारी वीज मलनि:सारण केंद्रासाठी वापरण्यात येत आहे. सदर ठिकाणी ७८ व ५२ दललि प्रतिदिन क्षमतेची दोन मलजलनि:सारण केंद्रे कार्यान्वित आहेत. गंगापूर येथे १८ दललि क्षमतेचे मलनि:सारण केंद्र बांधून कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तसेच पिंपळगांव खांब येथे ३२ दललि क्षमतेचे मलनि:सारण केंद्र बांधणीच्या कामापैकी मलजल उपसा केंद्राचे काम सुरु करण्यात आले आहे.

पॉवर फॅक्टर इन्सेन्टिव्ह – मनपाचे सर्व जलशुध्दीकरण केंद्र, पंपींग स्टेशन व मलशुध्दीकरण केंद्र येथे महावितरण कंपनीचे उच्च दाबाचे वीज कनेक्शन आहेत. सर्व केंद्रांवर

पॉवर फॅक्टर मध्ये सुधारणा करुन वीज बिलांत बचत करण्यात येत आहे. त्यामुळे वीज बिलांत बचत होऊन मनपाचा आर्थिक फायदा होतो.

विद्युत व्यवस्था :

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील मनपाच्या रस्त्यांवर अस्तित्वात असलेल्या पथदीप सुस्थितीत ठेवणे, पथदीप सुधारणा करणे तसेच ज्या ठिकाणी पथदीपांची व्यवस्था नाही अशा ठिकाणी नविन पथदीप पोल उभारुन पथदीपांची व्यवस्था करणे, वाहतूक स्वयंचलीत यंत्रना बसविणे, मनपाचे कार्यालये, रूग्णालये, शाळा इमारती इत्यादी ठिकाणी विद्युतीकरण करणे, सीसीटीव्ही बसविणे इत्यादी सुविधा उपलब्ध करुण देणेत येत असुन सदर कामे प्रस्तावित आहेत.

सन १९-२० प्रत्यक्ष	१३.६२
सन २०-२१ सूधारीत	१०.१८
सन २१-२२ प्रस्तावित	२५.७४
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

मा.महाराष्ट्र शासनाने उर्जा बचतीचे धोरण लागू केल्यामुळे सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षात शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे पथदिव्यांमध्ये वीज बचतीच्या पध्दतीच्या अवलंब सुरू असुन त्यानुसार Smart Lighting चा प्रस्ताव मा.महासभा व मा. स्थायी समिती कडुन मंजुर करून घेणेत आला आहे.

नाशिक महानगरपालिकेमार्फत संपूर्ण नाशिक शहरातील अस्तित्वात असलेले पारंपारीक पथदीप बदलणे, सार्वजनिक खाजगी सहभागातुन (PPP तत्वावर) स्मार्ट स्ट्रीट लाईट बसविणे व CCMS (Common Control Monitoring System) प्रणाली कार्यान्वित करणेसाठीचा प्रकल्पाचे कामकाज चालु केले आहे. सदरच्या प्रकल्पामध्ये मनपाची कोणतीही भांडवली गुतंवणुक नसुन सदरचे काम मार्च २०२१ पर्यंत पुर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पामध्ये पथदिप सेवे मध्येही सुधारणा होवुन शासनाचा National Lighting code SP ७२: २०१० प्रमाणे प्रकाशाचा स्तर राहणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष विजेच्या वापरामध्ये व पथदिप देखभाल दुरुस्तीच्या खर्चामध्ये बचत होणार आहे. अत्याधुनिक CCMS (Common Control Monitoring System) प्रणाली वापरणेत येणार असल्याने कामकाज पारदर्शकपणे व मानवी हस्तक्षेपाशिवाय पार पाडणे शक्य होणार आहे. या प्रणालीमुळे लाईट चालु व बंद करणेच्या वेळा निर्धारण करणे व नादुरुस्त झालेले पथदिप दुरुस्त करणे बाबत रिअल टाईम माहिती उपलब्ध होऊन नागरिकांना वेळीच दर्जेदार सेवा उपलब्ध होतील.

मनपाच्या PPP तत्वावरील स्मार्ट लाईटींग प्रकल्पाचे ८०% काम यशस्वीपणे पुर्ण झालेले आहे, उर्वरित काम प्रगतीपथावर आहे, या प्रकल्पामुळे मनपाची पथदिवे दुरुस्ती साहीत्य खरेदीपोटी होणारे वार्षिक ४.०० कोटींची बचत होणार आहे, तसेच वाढलेल्या पथदिप संख्येमुळे त्यांच्या दुरुस्तीकामी लागणाऱ्या अतिरिक्त मनुष्यबळ खर्चात वार्षिक ३.०० कोटीची बचत होणार आहे. याव्यतिरिक्त बचतीच्या रक्कमेमधुन ५ % हिस्सा मनपास मिळणार आहे.

नाशिक शहराच्या काही भागांमध्ये अजुनही रस्त्यांवर पथदिप नाहीत. तसेच काही ठिकाणी विद्युत खांबांच्या सलगतेमध्ये खंड पडलेला आहे. त्याकरिता आवश्यक ठिकाणी विद्युत पोलची उभारणी करणे व पथदिप व्यवस्था सुधारणा करणे तसेच शहरात १५ ते २० वर्षापुर्वी बसविलेले गंजलेले/खराब पथदिप/ पोल बदलण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी अंदाजपत्रकात आवश्यक तरतुद करण्यात आली आहे.

नाशिक मनपा मार्फत शहरात विविध चौकांमध्ये ४७ ठिकाणी स्वयंचलीत ट्रॅफीक सिग्नल कार्यन्वित आहेत. सन २०२१-२२ मध्ये नाशिक मनपा अर्बन मोबिलीटी सेलच्या सुचनेप्रमाणे सिग्नलची ठिकाणे/चौक प्रस्तावित करणेत येणार आहे.

ITMS (Intergrated Traffic Management System) शहरातील स्वयंचलीत वाहतुक सिग्नल यंत्रणेचे नाशिक स्मार्ट सिटी कंपनी व शासनाची महा-आयटी कंपनी मार्फत नुतनीकरण करणेचे काम चालु करणेत आलेले आहे. सदरच्या सिग्नलवर CCTV कॅमेऱ्याची व्यवस्था केली जाणार असुन त्याचे नियंत्रण पंचवटी स्मार्ट सिटी कार्यालयातील ICCC मध्ये राहणार आहे.

नाशिक मनपा स्मार्ट सिटी मार्फत RESCO (Renewable Energy Service Company) मॉडेल नुसार मनपा कार्यालये, रुग्णालये व इमारतीवर सोलर रुफ टॉप बसविणेचा पथदर्शी प्रकल्प हाती घेणेत आलेला आहे. सद्यस्थितीत मनपा साधारणपणे र.रु.११ प्रती युनिट प्रमाणे वीज खरेदी करत आहे. सोलर प्रकल्पा अंतर्गत आगामी २५ वर्षासाठी मनपास र.रु.४.५९ प्रती युनिट प्रमाणे सोलर वीज प्राप्त होणार आहे. अशा प्रकारे मनपाच्या रुफ टॉप बसविणेसाठी मनपाने SECI (केंद्र् शासनाच्या गाईड लाईन्स्) नुसार पॉवर पर्चेस करारनामा केलेला आहे. मनपाची मुख्यालये, विभागीय कार्यालये व फायर स्टेशन यांचे रुफ टॉप वर सोलर पॅनल बसवुन झालेली आहे. उर्वरित ठिकाणी काम प्रगतीपथावर असुन याप्रकल्पामुळे मनपाची वीजबिलात वार्षिक अंदाजे र.रु. १.००कोटींची बचत होणार आहे.

कार्यशाळा व्यवस्थापन :

सन १९-२० प्रत्यक्ष	६.४४
सन २०-२१ सूधारीत	९.३२
सन २१-२२ प्रस्तावित	१५.००
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

नाशिक महानगरपालिकेच्या सार्वजनीक आरोग्य विभागाकरीता ॲम्ब्युलंन्स खरेदी करण्याचे नियोजन आहे. तसेच सार्वजनीक आरोग्य अभियांत्रिकी विभागाकरीता छोटी जेटींग प्रेशर गाडी घेणे कामी विभागांतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सार्वजनीक आरोग्य अभियांत्रिकी (पाणी पुरवठा) विभागासाठी वॉटर टँकर खरेदी करणे बाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर कामांकरीता सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद धरणेत आलेली आहे.

माहिती व तंत्रज्ञान :

ई- गव्हर्नन्स E- Governance -

सन १९-२० प्रत्यक्ष	१.७८
सन २०-२१ सूधारीत	३.०३
सन २१-२२ प्रस्तावित	५.६५
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

मा. महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरण २००१ अन्वये नाशिक महानगरपालिकेच्या संगणकीकरणाच्या कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा आधिकाधिक वापर करुन दैनंदिन कामकाजात सुसुत्रता, गतीमानता व पारदर्शकता प्रस्थापित करण्याचा नाशिक महानगरपालिका प्रशासनाचा मानस आहे.

नाशिक महानगरपालिका जैवीक कचरा विल्हेवाट प्रकल्प व्यवस्थापन व शुल्क संकलनाकरीता ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्याचे प्रस्तावित असुन जेणेकरुन वैद्यकीय आस्थापना तसेच वैद्यकीय व्यावसायिकांना जैवीक कचरा विल्हेवाट प्रकल्प सभासद शुल्क व मासिक शुल्क, तिमाही, सहामाही व वार्षिक शुल्क संगणकीय कार्यप्रणालीद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देता येईल.

मा. शासन निर्णय परिपत्रक क्रमांक सीओएम २०१२/प्र.क्र.२५/२०१३ संगणक कक्ष, दिनांक ०५/०५/२०१४ अन्वये विभागातील कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे, तसेच त्याची अंमलबजावणी करणेबाबत नमुद केलेले असुन नाशिक महानगरपालिकेत ई-एलएफएमएस प्रणालीची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी सुरु असुन सदर कार्यप्रणालीचे अपग्रेडेशन करण्याचे प्रस्तावित आहे.

नाशिक महानगरपालिका समाजकल्याण विभागांमार्फत दिव्यांग बांधवांकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे तसेच महिला व बालकल्याण विभागांमार्फत महिला व बालकांकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे संगणकीकरण करुन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे एका क्लिकसरशी विविध कल्याणकारी योजना उपलब्ध करुन देण्याचा मनपाचा मानस आहे, जेणेकरुन मनपामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती तात्काळ उपलब्ध करुन देता येईल तसेच योजनांचे तपशील व अर्ज, आवश्यक कागदपत्रे तसेच अर्ज स्विकृती व तद्अनुषंगिक बाबींची माहिती हया ऑनलाईन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे देण्याचे प्रस्तावित आहे.

मा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक ईजीव्ही-२०१७/प्र.क्र.०८/ई-गव्हर्नन्स, दिनांक १६ जुन २०१७ मध्ये नमुद केलेनुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या वैद्यकीय सुविधांचे ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातुन सुलभीकरण करुन वैद्यकीय सेवा हया जलद व प्रभावीरित्या पुरविण्याचे प्रस्तावित आहे, त्यानुसार प्रस्तावित ई-हॉस्पीटल मॅनेजमेंट (HMIS) हया संगणक प्रणालीचा वापर प्रायोगिक तत्वावर नाशिक महानगरपालिकेच्या एका प्रसृतीगृहामध्ये करण्यात येत आहे, सदर योजनेची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सर्व मनपा रुग्णालयांत करण्यात येणार आहे, सदरहु ई-हॉस्पीटल (HMIS) संगणक प्रणालीचा वापर करुन मनपा रुग्णालयांत दर्जेदार सेवा पुरविणे तसेच कार्यक्षमतेत वाढ करुन हॉस्पीटल सेवेच्या अत्यावश्यक कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

पर्यावरण व गोदावरी संवर्धन

नाशिक मनपा क्षेत्रातुन गोदावरी नदीचे पात्र सुमारे १९ कि.मि. लांबीचे व सुमारे १०० फुट रुंदीचे प्रवाहीत होते. गोदावरी नदीच्या वरील बाजुस असलेल्या गंगापुर धरणाच्या धरणसाठयातुन वेळोवेळी शेतीच्या वापरासाठी, औदयोगिक वापरासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी, धार्मिक उत्सवाच्या काळामध्ये स्नानाच्या प्रयोजनासाठी गोदावरी नदीपात्रात पाण्याचे आवर्तन सोडण्यात येते. मनपा क्षेत्रातील गोदावरी नदी प्रवाहाच्या मार्गामध्ये आनंदवल्ली, होळकरपुल, तपोवन याठिकाणी छोटे छोटे बंधारे अस्तित्वात आहेत, ज्यामुळे या बंधाऱ्यांच्या वरील भागामध्ये पाण्याचा साठा होतो. गोदावरी नदी बारमाही नसल्यामुळे उपलब्ध आवर्तनाच्या द्वारे प्राप्त होणाऱ्या जलसाठयाचे सवंर्धन करणे व त्यामध्ये कुठल्याही प्रकारचे प्रदुषण होवू नये, यासाठी गोदावरी संवर्धन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

सन १९-२० प्रत्यक्ष	०.४२
सन २०-२१ सूधारीत	४.४७
सन २१-२२ प्रस्तावित	३६.१६
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

गोदावरी नदीपात्रामध्ये नागरीकांकडून कुठल्याही प्रकारचा केरकचरा टाकणे, कपडे धुणे, वाहने धुणे, निर्माल्य टाकणे वा इतर कुठल्याही प्रकारे नदी प्रदुषण केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतुद करण्यात आली आहे. तसेच होळकर पुल ते टाळकुटेश्वर पुलाच्या दरम्यान स्वच्छतेबाबत विशेष लक्ष देण्यात येते.

स्मार्ट सिटी अंतर्गत "प्रोजेक्ट गोदा"या प्रकल्पामध्ये गोदावरी नदीला येवून मिळणाऱ्या उपनद्यांमध्ये मिसळणारे मलजल अडविणे व वळविणे प्रस्तावित करण्यात आले आहे, ज्यामुळे नदीपात्राचे होणारे प्रदुषण थांबविले जाणार आहे. तसेच होळकर पुलापासून ते फॉरेस्ट नर्सरी पुलापर्यंत नदीपात्रातील गाळ, माती काढली जाणार आहे. त्यामुळे गोदावरी नदीपात्राची वहन क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. होळकर पुलापासून ते टाळकुटेश्वर पुलापर्यंत गोदावरी नदीपात्राचे सुशोभीकरण तसेच नदीपात्राचे विस्तारीकरण प्रस्तावित करण्यात आले आहे, ज्यामध्ये येणाऱ्या भाविक व पर्यटकांसाठी विविध सोई सुविधा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

तसेच स्मार्ट सिटी अंतर्गत यांत्रिक ट्रॅश स्किमर मशिन कार्यरत करण्यात आले असून त्याद्वारे अधिक परिणामकारक पध्दतीने पानवेलीचे निर्मुलन केले जाते. गोदावरी प्रमाणेच इतर उपनदयांचे प्रदुषण मुक्त सर्व्हेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

पर्यावरण

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७-अ अन्वये व मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंट केंद्र सरकार यांच्या प्राप्त सुचनेनुसार महानगरपालिका यांना पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल (इनव्हायरमेंट स्टेटस रिपोर्ट) तयार करणे तसेच भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार अहवाल जनहितार्थ प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

नाशिक मनपा कार्यक्षेत्रातील पर्यावरण स्थितीदर्शक अहवालात हवा प्रदूषण, जलप्रदूषण, टाकाऊ घनपदार्थामुळे होणारे प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, इ. सर्व बाबींचे वेळोवेळी मापन करुन त्यानुसार अहवाल तयार करणे, तसेच सदरचा अहवाल मा. महासभेच्या अवलोकनार्थ सादर करणेत येतो.

मा. केंद्र शासनाने १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाअंतर्गत नाशिक शहरासाठी मंजुर केलेल्या शुध्द हवा कृती योजनेचे प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी र.रू. २० कोटी इतका निधी नाशिक महानगरपालिकेस वितरीत केला आहे. सदर मंजुर निधीअंतर्गत शुध्द हवा कृती योजनेमध्ये नमुद केल्यानुसार विद्युत शवदाहिनी, धुलीकण कमी करण्यासाठी यांत्रिक पध्दतीने मोठे रस्ते स्वच्छ करणे इ. उपययोजना करण्यात येणार आहे.

समाजकल्याण :

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध दुर्बल घटकांना उचित सेवासुविधा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने, मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी ५ टक्के, महिला/ बाल कल्याणासाठी ५ टक्के, दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के व क्रीडा धोरणासाठी ५ टक्के असा एकुण २० टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

सन १९-२० प्रत्यक्ष	११.५२
सन २०-२१ सूधारीत	३५.२४
सन २१-२२ प्रस्तावित	४१.८९
*भांडवली व महसुली खर्च, (आस्थापना व बांधकाम खर्चावर आधारीत उपकर वगळुन)	

५ % मागासवर्गीय कल्याणकारी योजना:

शासन मार्गदर्शक सुचनांनुसार महापालिका क्षेत्रातील अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती या दुर्बल घटकांकरीता विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ५ टक्के निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर निधीतुन मागासवर्गीय वस्त्यांमध्ये सार्वजनिक रस्त्यांची कामे, पथदीप, पाणीपुरवठा, मल:निस्सारण व्यवस्था, उद्यान विकास व त्यांचे देखभाल दुरस्तीची कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मागासवर्गीय युवक व युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे देखील नियोजन करण्यात येत आहे.

सन १९-२० प्रत्यक्ष	७.४८
सन २०-२१ सूधारीत	२२.४४
सन २१-२२ प्रस्तावित	३२.६३
*भांडवली व महसुली खर्च (आस्थापना वगळून)	

५ % महिला व बाल कल्याण योजना:

- घटस्फोटीत/विधवा/परित्यक्त्या महिलां यांचे मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य योजना
- विधवा/घटस्फोटीत महिलांची मुले, निराधार मुले यांचेसाठी शिष्यवृत्ती योजना
- अनाथ/निराश्रित मुलांना दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनपर अनुदान योजना.
- अनाथ/निराश्रित मुलांकरीता वार्षिक शैक्षणिक शुल्क अर्थसहाय्य योजना सुरु करण्यात आल्या आहेत.

